जा.क्र.ई-04/पदोन्नती/पोहवा.वितं.ते सपोउनि.वितं./2015/5080
अपर पोलीस महासंचालक व संचालक यांचे कार्यालय,
पोलीस बिनतारी संदेश, महाराष्ट्र राज्य, पुणे-08.
दिनांक :- 04 जुन, 2015.

विषय :-पोलीस बिनतारी संदेश विभागातील पोलीस हवालदार/विजतंत्री यांचे सहा.पोउपनि./विजतंत्री या पदावरील पदोन्नतीवर नेमणुकीबाबत. (निवड सुची सन - 2014-2015)

***************

आदेश :-

02/- पोलीस बिनतारी संदेश विभागातील खालील नमुद पोलीस हवालदार/विजतंत्री यांना त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या ठिकाणी त्यांनी कार्यभार ग्रहण केल्याच्या तारखेपासून सहा.पोलीस उपनिरीक्षक/विजतंत्री या पदावर स्थानापन्न व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची ( provisional ) पदोन्नती देऊन नेमणूक देण्यात येत आहे.

पोलीस हवालदार (विजतंत्री) :- वेतनश्रेणी :- रु.5200 - 20200+ ग्रेड पे 2400/-

सहा.पोउपनि. (विजतंत्री) :- वेतनश्रेणी :- रु.5200 - 20200+ ग्रेड पे 2800/-

| अ. क्र. | पोलीस हवालदार/ विजतंत्री यांचे नांव व जातीचा प्रवर्ग | सध्याची नेमणूक व आस्थापना | पदोन्नतीवरील नेमणूकीचे ठिकाण व आस्थापना | पदोन्नती कोणत्या प्रवर्गातून | शेरा. |
|---|---|---|---|---|---|
| 01 | श्री.राऊत नामदेव तुकाराम. मराठा (खुला) | सांगली पोलीस अधीक्षक, सांगली | सातारा पोलीस अधीक्षक, सातारा | खुल्या प्रवर्गातून | रिक्त पदावर |
| 02 | श्री.उपासनी प्रदिप हरी. ब्राम्हण (खुला) | नाशिक शहर पोलीस आयुक्त, नाशिक शहर | नागपुर परिक्षेत्रीय कार्यालय, नागपूर पोलीस अधीक्षक, बि.सं., पूर्व विभाग, नागपूर. | खुल्या प्रवर्गातून | रिक्त पदावर |
| 03 | श्री.मिरेकर तमन्ना मार्या. वडारी (विजा-अ) | रारापोबल गट क्र.11 नवी मुंबई समादेशक, रारापोबल गट 11 नवी मुंबई | मुंबई पोलीस उपआयुक्त, बि.सं.,मुंबई | विजा-अ प्रवर्गातून | रिक्त पदावर |

03/- उपरोक्त कर्मचा-याविरुध्द विभागीय चौकशी / कोर्ट केस / अन्य चौकशी चालू असेल किंवा ते एखादी शिक्षा भोगत असतील तर, शिक्षेची अंमलबजावणी होणेसाठी पदोन्नतीच्या उच्च पदावर ते शिक्षा भोगण्यास तयार असल्याबाबत लेखी संमती पत्र संबंधित घटक प्रमुखांनी त्यांचेकडून त्यांना पदोन्नतीवर कार्यमुक्त करणे पूर्वी घ्यावे. जर त्यांनी लेखी संमती देण्याचे नाकारल्यास तसे या कार्यालयास तात्काळ कळविण्यात यावे.

—02—

04/- सदरच्या पदोन्नतीवरील नेमणूक मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे प्रलंबित रिट पिटीशन क्रमांक 8452/04 मधील अंतिम निकालाच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

05/- अ.क्र.03 मधील नमुद श्री.मिरेकर हे विजा-अ प्रवर्गाचे उमेदवार असून, त्यांनी अद्याप त्यांचे जातवैधता प्रमाणपत्र या कार्यालयास सादर केलेले नाही. श्री.मिरेकर यांना मा.पोलीस महासंचालक, म.राज्य, मुंबई यांचे परिपत्रक क्र.पोमसं/14-अ/67/एम.एन./129/2014, दि.01/09/2014 व मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल एलएलपी क्र.33356 ते 33370/2011 चे अंतिम निर्णयास अधीन राहून व श्री.मिरेकर सदर आदेश निर्गमित झाले दिनांकापासुन 06 महिन्यांचे आंत त्यांचे जातवैधता प्रमाणपत्र सादर करणेचे अटीस अधीन त्यांना वरील प्रमाणे सपोउपनि./विजतंत्री पदी तात्पुरती पदोन्नती देणेत येत आहे. तशी त्यांना लेखी समज देणेत यावी व त्यांचे जातवैधता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेवून ते या कार्यालयास सादर करावे.

06/- पदोन्नती नंतर कनिष्ठ पदातील वेतनवाढीनंतर वेतन निश्चितीकरिता द्यावयाच्या विकल्पासंबंधी शासन अधिसूचना वित्त विभाग क्रमांक वेपूर 1298/ प्रक्र-13/98/सेवा-10 दि.10/12/ 1998 च्या आदेशाची माहिती सहा.पोलीस उपनिरीक्षक/विजतंत्री या पदावर पदोन्नती झालेल्या कर्मचा-यास द्यावी. असा विकल्प द्यावयाचा असेल तर त्यांनी पदोन्नती मिळाल्या तारखेपासून एक महिन्याच्या आंत असा विकल्प द्यावा. मुदतीत विकल्प न आल्यास तो ग्राहय धरला जाणार नाही व त्यांची वेतननिश्चिती म.ना.से.(वेतन ) नियम - 1981, नियम क्र.11(एक) (ए) प्रमाणे करण्यात येईल याची संबंधितांस समज द्यावी.

07/- **कालबध्द पदोन्नती घेतलेल्या कर्मचा-यांना पदोन्नतीच्या पदावरील वेतन निश्चिती अनुज्ञेय असणार नाही. कालबध्द पदोन्नती दिलेल्या कर्मचा-यांपैकी जे कर्मचारी पदोन्नती स्विकारण्यास तयार नसतील त्यांची कालबध्द पदोन्नती ( वरिष्ठ वेतन श्रेणी ) काढून घेण्यात यावी. त्याप्रमाणे अहवाल सादर करावा.**

08/- सदरची नियुक्ती महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम 2005 मधील तरतुदीनुसार करण्यात येत आहे.

09/- उपरोक्त पदोन्नती झालेल्या पोलीस हवालदार/विजतंत्री यांना पदोन्नतीवरील नियुक्तीच्या ठिकाणी **तात्काळ कार्यमुक्त करुन** त्यांचा कार्यमुक्त केल्याचा दिनांक व सहा.पोलीस उपनिरीक्षक/विजतंत्री या पदाचा कार्यभार स्विकारल्याचा दिनांक या कार्यालयास उलट टपाली कळवावा. तसेच सदरील कर्मचारी हे पदोन्नतीवर बदली झालेले ठिकाणी या आदेशाचे तारखेनंतर एक महिन्याचे आत हजर न झाल्यास त्यांची सेवाज्येष्ठता ते पदोन्नतीवर हजर होतील त्या दिनांकापासून धरणेत येईल. तसेच संबंधित आस्थापना अधिकारी यांनी पदोन्नती झालेल्या कर्मचा-यांच्या सेवापटामध्ये पदोन्नतीच्या आदेशाचा क्रमांक व दिनांकाची नोंद घ्यावी.

10/- **पोलीस बिनतारी संदेश विभागातर्फे पदोन्नत कर्मचा-यांचे अभिनंदन व त्यांना शुभेच्छा देणेत येत आहेत.**

( जगन नाथ )
अपर पोलीस महासंचालक व संचालक
पोलीस बिनतारी संदेश, महाराष्ट्र राज्य,पुणे-08.

प्रति,

पोलीस आयुक्त, नाशिक शहर.
पोलीस अधीक्षक, सांगली / सातारा.
पोलीस उपआयुक्त, बिसं.,मुंबई.
पोलीस अधीक्षक, बि.सं.,पूर्व विभाग, नागपूर.
समादेशक, रारापोबल गट क्र11, नवी मुंबई.
पोलीस उपअधीक्षक, बि.सं., नागपूर परिक्षेत्र.

प्रत : -

पोलीस अधीक्षक, बिसं.,पश्चिम विभाग, पुणे.
पोलीस उपअधीक्षक, बिसं.,कोल्हापूर परिक्षेत्र.
पोलीस निरीक्षक,बि.सं.,सांगली / सातारा / नाशिक शहर/ रारापोबल गट क्र11, नवी मुंबई.

स्थानिक प्रती :-

पोलीस अधीक्षक बिनतारी संदेश, मुख्यालय, पुणे.
प्रमुख लिपिक आस्थापना शाखा - 02/ भरती कक्ष / क' शाखा.